ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार

**प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड**
लोक प्रशासन विभाग राजीव गांधी महाविद्यालय,
करमाड, ता.जि. औरंगाबाद.

महात्मा जोतीराव फुले हे भारतीय समाज व शिक्षण क्रांतीचे जनक म्हणून संबोधले जातात. त्यांच्या शिक्षण विषयक विचारसरणीचा व कार्याचा प्रभाव भारतीय दलित, पीडित, शोषित, जनसामान्यांच्या जीवनावर व भारतीय समाजजीवनावर मोठया प्रमाणात पडलेला दिसुन येतो. त्यांचे जीवन व कार्य हे प्रस्थापित विरूध्द विस्थापीत, प्रतिष्ठित विरूध्द अप्रतिष्ठित, शोषक विरूध्द शोषित यांच्या न्याय हक्काच्या जपणुकीस्तव सामाजिक संघर्षाचे होते. कोणत्याही शासनसत्तेचा व पुरेशा प्रमाणातील आर्थिक पाठबळाचा आधार नसताना ते जे करू शकले त्याला भारतीय समाजक्रांतीच्या इतिहासात तोड नाही. त्यांचे हे सामाजिक ऋण सर्वमान्य आहे.

'विद्येविना मति गेली, मतिविना नीती गेली नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले वत्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले'हा जोतिबा फुले यांचा शिक्षणविशयक तात्विक विचार होता. विद्या नसली की मती कुंठित होते. नीतिमत्ता ढासळते, नीतिमत्तेच्या अभावाने समाजाची गती किंवा प्रगती यात अडथळे निर्माण होतात. संपत्ती मिळविण्याची साधने केंद्रीभूत होतात व सताजातील मागासवर्गीय बहुजन समाज आपले मनोधैर्य गमावून बसतो. समाजाच्या अधोगतीची ही तर्कनिष्ठ विचारसरणी हा जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा गाभा होय.

जोतीबांचा हा उद्‌गार अलंकारिक भाषेत तर नाहीच किंवा तो निर्जीव सुभाषितासारखाही नाही अथवा जड व पांडित्यपूर्णतेचा दबाव निर्माण करणाराही नाही. तत्कालीन महाराष्ट्राची ही जशी सामाजिक चिकित्सा आहे, त्याचप्रमाणे शिक्षणाचे प्रयोजन सांगणारा हा एका समाजषिक्षकाचा सार्थ उद्‌गारही आहे. या उद्‌गारात मति, नीतीचा जसा विचार आहे. तसाच गति, वित्ताचाही विचार आहे. शिक्षणापासुन वंचित झालेला आणि म्हणूनच अज्ञान अंधःकारात पिचत पडलेला व त्याला प्रगतीच्या पाऊलवाटाही अद्याप दृष्टीस पडू दिल्या नाहीत अशा तळागाळाच्या माणसाबाबतची व्याख्या फारच बोलकी आहे. आपण जेव्हा शिक्षण ही समाजविकासाची अखंड प्रक्रिया आहे असे म्हणत असतो तेव्हा विव्दान लोकांना कोणता समाज अभिप्रेत आहे असा प्रश्न विचारण्याची आपल्यावर वेळ येते. म्हणूनच जोतीरावांचा वरील उद्‌गार शिक्षणाचा सामाजिक बांधिलकी व्यक्त करणाराही आहे. समाज–जीवनाच्या गरजा, आशाआकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जेव्हा अतूट संबंध तयार होते तेव्हाच शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे परिणामकारक हत्यार बनते. जोतीरावांचे शिक्षण विषयक कार्य, शिक्षणाबद्दलचे त्यांचे व तत्वज्ञान, त्यांनी व सावित्रीबाईंनी शिक्षणविषयक केलेले प्रयोग, इत्यादींचा विचार केला म्हणजे जोतिरावांनी समाजबदलासाठी शिक्षणाचे हत्यार कसे वापरले हे स्पष्ट होते.

**कालपरत्वे बदलती शिक्षणपध्दती** बदलत्या सामाजिक परिस्थिती बरोबर शिक्षण पध्दतीही बदलत असते. बदलणारी शिक्षणपध्दती समाजाच्या धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावरही परिणाम करीत असते. अर्थात आजच्याप्रमाणे सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पनाही प्राचीन कालखंडात नव्हती. त्या काळात शिक्षणापासूनच्या अपेक्षाही आजच्यापेक्षा वेगळ्याा होत्या. ही स्थिती फार दूरवरच्या प्राचीन काळातच होती असे नव्हे तर अगदी इंग्रजांचे राज्य या देशात स्थिर होईपर्यंत येथील शिक्षणपध्दती जुनाट स्वरूपाचीच राहिली.
धर्मग्रंथ व इतर अभिजात वाङ्‌मयाचा अभ्यास हाच शिक्षणाचा हेतू होता अर्थात यासाठी संस्कृत, पाली, फारसी, अशा, ज्या ज्या भाशा धर्म व्यवहारासाठी वापरल्या जात होत्या त्याच भाषा शिक्षणाचे माध्यम बनत. दुसरे असे की, देशी भाशेचे लेखन, वाचन, हिशेब इ. सामान्य स्वरूपाचे शिक्षण दिले जाई. पहिल्या स्तरावरील शिक्षण समाजातील उच्चवर्णियांसाठी होते तर दुसऱ्या पातळीवर उच्च जातीबरोबर समाजातील मध्यम जातीतील काहीजणांना प्रवेश दिला जात असे.

शिक्षण ही एक शाक्ती आहे. मानव इतर सजीवापेक्षा वेगळा व वैशिष्ठ्यापूर्ण ठरला तो त्याच्या ज्ञानसाधनेमुळेच. शिक्षण हे समाज बदलण्याचे प्रभावी साधन आहे. बदलत्या समाजाबरोबर मानवी इतिहासात शिक्षणाचा मूळ झरा अधिक व्यापक बनला. त्याने अनेक देशात नवजीवनाची उभारणी केली. रूढी, परंपरा, दैववाद, गरिबी, यामध्ये खचून गेलेल्या कष्टकरी जनतेला स्वत्वाची जाणीव करून दिली.

बदलत्या समाजाबरोबर शिक्षणपध्दतीत, तिच्या आशयात बदत होत आले असले, ती अधिक व्यापक व विकसनशील होत आली असली तरी हे बदल सुखासुखी झाले नाहीत. धर्ममार्तंडांच्या, पुराणमतवाद्यांच्या, पुरोहितशाहीच्या हिताचे रक्षण करणारी समाजव्यवस्था व तिच्या अनुशंगाने शिक्षणव्यवस्था बदलत असताना या प्रस्थापित वर्गाने कडवा विरोध केला. या संघर्शातुनच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एका क्रांतीकारी पर्वाला आरंभ झाला. त्यातूनच अनेक क्रांत्यांनी व

क्रांतिकारकांनी जन्म घेतला. शिक्षण व शिक्षण पध्दतीत अधिक प्रगत स्वरूपाचा घडून येणारा बदल बहुजनांच्या हिताचा असतो. येथेही संघर्ष अटळ असतो. ते एक प्रकारचे क्रांतीकार्य असते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा जोतीराव फुल्यांनी अशीच शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली.

**शैक्षणिक कार्याची प्रेरणा व सुरूवात** जोतिबा फुल्यांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरवात इ.स. 1848 मध्ये शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन करुन केली. हा काही योगायोग अथवा चमत्कार नव्हता. महात्मा फुल्यांच्या चिंतनशील मनाने शिक्षणप्रसाराच्या कार्याला आरंभ करताना तो कोठे करावा हे नेमके हेरले. ज्यांच्या जीवनात शेकडो वर्षात अज्ञानाचा प्रचंड पाशाणवत पहाड निर्माण झाला होता, तो दलित, बहुजन समाज व स्त्रिया हेच राष्ट्रपरिवर्तनाचे मुख्य संख्याबळ आहे याची अचूक जाणीव जोतीबांना झाली. म्हणून अज्ञाना विरूध्दचा पहिला सुरूंग त्यांनी या क्षेत्राच पेरला. या कामात त्यांना सुरवातीपासुन सदाशिवराव गोवंडे या मित्राचे सहकार्य लाभले.

जोतीबांच्या मनात जे शिक्षणविषयक विचार येत होते त्यांना निश्चित दिशा मिळाली ती मिस फॅरार यांच्या शाळा पाहून. जोतीबांनी त्यावेळी पुढील उद्‌गार काढले, ''माझ्या देश बांधवांपैकी महार, मांग, चांभार या कनिष्ठ जातीतील बंधू हे दुःख आणि अज्ञान यात साफ बुडालेले आहेत. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी दयाळू देवाने मला प्रेरणा दिली. स्त्रियांच्या शाळेने माझ प्रथम लक्ष वेधले. पूर्ण विचारांनी माझे असे मत झाले की पुरुशांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात. अशा विचारात मी असताना अहमदनगर येथील अमेरिकन मिषनमधील मिस फॅरार या बाईंनी चालविलेल्या शाळा मी एका मित्रासमवेत पाहिल्या. ज्या पध्दतीने त्या मुलांना शिक्षण देण्यात येत होते ती पध्दत पाहून मी फार खूश झालो.

**विविध शैक्षणिक उपक्रम** – 3 जुलै 1851 रोजी बुधवार पेठ येथे तसेच सप्टेंबर 1851 व मार्च 1852 ला अनुक्रमे रास्तापेठ व वेताळपेठ या ठिकाणी नव्या शाळा सुरू केल्या. कामाचा व्याप व उत्साह वाढत होता तरीही अडचणी काही संपत नव्हत्या. जोतीबांच्या शाळेत मुले आणि मुली एकत्र शिक्षण घेतात याबद्दल नापसंती व्यक्त केली जात होती. प्रतिगाम्यांना कोणतेही निमित्त देण्याची जोतीरावांची तयारी नव्हती. त्यांनी 21 ऑगस्ट 1852 मध्ये मुला–मुलींची स्वतंत्र शाळांतून शिक्षणाची सोय केली. सावित्रीबाई मुलींच्या शाळेत तर जोतीबा दोन्हीही शााळांत शिकविण्याचे काम करीत. आता या कामात त्यांना काही ब्राम्हण शिक्षकांचेही सहकार्य मिळू लागले. जोतीबांच्या या शाळेत शिक्षण घेणारी सर्वच मुले–मुली गरीब घरातील होती. त्यांच्या घरात केवळ शिक्षणाची परंपराच नव्हती तर त्या घरांची ग्रंथ, वर्तमानपत्रे विकत घेण्याची कुवतही नव्हती. अशा सर्वांचा विकास घडवून आणावयाचा होता. हे काम पोटार्थी उद्योग करणाऱ्या शिक्षकांच्या हातून घडणे अवघड होते. जोतीबांना मात्र आपल्या विद्यार्थ्यांना ठराविक विषयांच्या शालेय शिक्षणाबरोबरच नव्या विचारांची ओळख व्हावी, आपल्या सभोवतालचे जग परिचयाचे व्हावे, आपला मागसपणा त्यांनी झटकून टाकावा यासाठी विविध विषयांचे ज्ञान देणाऱ्या ग्रंथांचे–वृत्तपत्रांचे वाचनालय आवश्यक वाटू लागले. त्यासाठी त्यांनी आपले तनमनधन वेचले आणि थोड्याच दिवसात गरजवंतांसाठी पहिली शाळा काढणाऱ्या ज्योतीबांनी त्या समाजातील मुला–मुलींसाठी पहिले वाचनालय काढले याची इतिहासाला नोंद घ्यावी लागली. आपल्या मुलांचा सर्वांगीण व्यक्तिविकास घडून आला पाहिजे यासाठी शक्य त्या उपक्रमांचा प्रारंभ आपल्या शिक्षण प्रयोगात त्यांनी केला.

**स्त्री शिक्षणाचे आद्य प्रवर्तक** – स्त्री शिक्षण म्हणजे कुटुंबाचे व पर्याचाने राष्ट्राचे शिक्षण होय. शिवरायाला घडविणारी जिजाबाई ज्या महाराष्ट्राचे पाहिली, त्या महाराष्ट्रात परंपरेच्या वरवंट्याखाली कित्येक स्त्रियांच्या आयुष्याचा चुराडाही झाला. केवळ ही अवस्था महाराष्ट्राचीच नव्हती तर आपल्या पुरातन संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या उभ्या भारतवर्षाची अशीच अवस्था होती. इंग्रजी शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध आहे असे शिक्षण घेणारा एक वर्ग जोतिबांच्या काळात महाराष्ट्रात उदयाला येऊ लागला होता. पुढे या वर्गातून महाराष्ट्राच्या व देशाच्या विविध क्षेत्रांत नावलैकिक संपादन करणारी अनेक मोठी माणसं झाली. परंतु या वर्गाने स्त्री–स्वातंत्र्याची खरी शक्ती ज्या शिक्षणात आहे अशा शिक्षणाचा जोतीबांसारखा ध्यास घेतला होता असे दिसून येत नाही. जोतीबांनी ज्या सामर्थ्याने आपल्या कार्यास सावित्रीबाईंना घडविले, उभे केले व आपली सुधारक पुढील काळात विधवाविवाह, बालविवाह, योग्य कि अयोग्य याची चर्चा करीत राहिले. या जाहीर वादविवादात स्त्रियांची व समाजसुधारणेची बाजू घेणारे प्रत्यक्ष कृतीच्या वेळी उणे पडले असेही दिसून येते. केवळ त्या काळातच अशा घटना घडत होत्या असे नव्हे तर परकियांची सत्ता संपली, स्वातंत्र्याच्या कालखंड सुरू झाला. वर्षामागून वर्षे उलटत आहेत, विज्ञानाचा प्रसार होतो आहे. तरी आज आपल्या देशात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. केवळ या एका गोष्टीचा विचार केला तरी किती प्रतिकूल परिस्थितीत मूलगामी शिक्षणकार्याला महाराष्ट्रात जोतीबा फुल्यांनी प्रारंभ केला हे दिसून येते.

**शुद्रांसाठी शिक्षण** – शुद्र हा आपल्या देशातील गुलामांचा एक मोठा वर्ग अशाच तऱ्हेने समाजव्यवस्था करण्यात आली होती. स्त्रियांप्रमाणे अस्पृष्यांना–शूद्रातिशूद्रांना कोणत्याही प्रकारच्या शिक्षणचा अधिकार नाही असा कायदा येथील धर्ममार्तंडांनी मोहरबंद केला होता. जोतीबांनी आईच्या अंतःकरणाने या मुलांकडे धाव घेतली. त्यांच्या शिक्षणासाठी, शक्य तेथे कपडे, राहण्या–जेवण्याची सोय, पाटी–पेन्सिलची तरतूद त्यांनी जीवापाड धडपड करून केली. अनेक अडचणींचे डोंगर पार करावे लागले तरी केवळ अक्षर ओळखी पुरतेच शिक्षण अस्पृश्यांना देण्यावर जोतीबांनी कधीच समाधान मानले

नाही. अन्यायाचा प्रतिकार करण्याचे व अस्मिता जागृत करण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्या शिक्षण पध्दतीत स्वीकारले. पिढ्यान्पिढ्या आपल्याच बांधवांना पायदळी तुडविणारी उच्चवर्णीय मंडळी इंग्रजांच्या ताब्यातून देश स्वतंत्र केल्यानंतर येथील दलित समाजाला समानतेने वागवतील अशी स्थिती जोतीबांना दिसत नव्हती व ती पुढे कमीअधिक प्रमाणात वस्तुस्थितीही ठरली.

जोतीबांनी या तळाच्या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देताना, त्यांच्याच समाजातील निश्ठावान सहकाऱ्यांना आपल्याबरोबर सहभागी करून घेतले. 'गुलामगिरी', ब्राम्हणांचे कसब' यासारख्या आपल्या ग्रंथांतून त्यांनी अस्पृश्यांच्या अज्ञानाला येथील प्रस्थापित वर्ग कसा जबाबदार आहे, हे स्पष्ट केले. आपल्या दैनंदिन जीवनात अस्पृश्यांच्या हक्कांसाठी ते नेहमी लढत राहणारे समाजशिक्षक होते. त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारकर्त्याची भूमिका घेतली नाही. तर एका क्रांतिकारकाच्या जिद्दीने त्यांना उठविण्याची, पेटविण्याची व माणूसकी जागविण्याची त्यांची धडपड होती. म्हणूनच अस्पृश्यांच्या शिक्षणाचा इतिहास महात्मा फुल्यांच्या

प्रयत्नांपासून सुरू होतो, हे कोणालाही नाकारता येणार नाही.**सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी** आजही आपल्या

स्वतंत्र भारताच्या शिक्षणमंदिरात वय 6 ते 14 या वयोगटातील मुलांना सक्तीने प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार बंधनकारक करूनही लक्षावधी मुलांना दाखल होता येत नाही. आपणच केलेला आपला हा कायदा आपणच मोडतो. शिक्षण घेण्याचे वय असलेली लक्षावधी लहान मुले कायद्याने बंधन घालूनही बालकामगारांचे अत्यंत कष्टप्रद जीवन आपल्या देशात जगत आहेत. जोतीबांच्या काळात तर प्राथमिक शिक्षणाची सरकारकडून होत असलेली आबाळ, हितसंबंधी लोकांनी शिक्षणाबद्दल पसरविलेला गैरसमज, जातिभेदांनी नाकारलेली संधी, गरीब आईवडिलांचे अज्ञान, शेतकऱ्यांची डबघाईला आलेली आर्थिक स्थिती, यासारख्या गोष्टी आपल्या शिक्षणप्रसारात कशा आडव्या येतात याची पुरेपूर जाणीव जोतीबांना झाालेली होती. जोतीबांनी तर कष्टकऱ्यांच्या प्रचंड मोठ्या मानवी समूहाला शिक्षणाची गरज आहे व त्यासाठी आपण शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत, असा ध्यास घेतला होता. म्हणूनच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने कायदेशीररीत्या स्वीकारली पाहिजे, अशी मागणी करणारा पहिला शिक्षणप्रेमी म्हणून जोतीबांचा उल्लेख करावा लागेल.

जोतिबा म्हणतात शेतकऱ्यांच्या मुलास अन्नवस्त्र, पुस्तके वगैरे पुरवून त्यांच्या मुलाकरिता बोर्डिंग शाळा तयार कराव्यात व त्या शाळांमध्ये त्या मुलांपैकी शाळागुरू तयार केल्यानंतर फक्त त्यांच्या शाळांत शूद्र शेतकऱ्यांनी आपली मुले अमुक वर्षाचे वयाची होईपावेतो अभ्यास करण्याकरिता पाठवावीत, असा कायदा करावा'' जोतीबांनी मुलांच्या शिक्षणाची वयोमर्यादा एके ठिकाणी 12 ते 14 वर्षांची असावी, त्याचप्रमाणे इंग्रजी आणि मराठी या भाषा बऱ्याच मुसलमान मुलांना अवगत नाहीत, त्यामुळे ही मुले शाळेपासून दूर राहतात याचाही विचार करावा असे मत व्यक्त केले आहे.

सक्तीच्या शिक्षणाचे तर्कनिष्ठतेवर आधारित तत्वज्ञान जोतिबा आपल्या विशिष्ठ शैलितून स्पष्टपणे व्यक्त करतात. सक्तीच्या शिक्षणाबाबत सरकारने काय करावे याबाबत ते म्हणतात, '' सरकारी सत्यपालाकडून त्या सर्व लोकांस (शेतकरी–कामकरी यांना) असा बोध करावा की तुम्ही आपली मुले तर शाळेत पाठविली नाहीत तर ती आळसामुळे उनाड होतील आणि आपली पोटे जाळण्याकरिता ती चोऱ्या करू लागतील, त्यामुळे त्यास सक्तमजुरीची षिक्षा देऊन पायात बेड्या घालून त्यांच्या संरक्षणासाठी सरकार खबरदारी ठेवावी लागेल. तशीच तुमची मुले आळसामुळे निसंग, बंडखोर होऊन प्रांतातील गावे लुटताना तेथील काही घरे जाळून लोकांची खूनखराबी करतील. त्यांच्या चीजवस्तूसह द्रव्याची नुकसानी करून त्यांच्या बायकापोरास तळतळावयास लावतील आणि तेथील एकंदर सर्व व्यापारधंद्यांची अव्यवस्था जर करतील तर सरकारात त्यातील कित्येक बंडखोरास तोफेच्या तोंडी देतील. त्या सर्वाप्रित्यर्थ सरकारास जेव्हा पोलीस ठेवण्याचा प्रसंग येईल, तेव्हा त्या सर्व खर्चाचा बोजा तुम्हा सर्व शेतकऱ्यांसह कारागिरास सोसावा लागेल.

अविद्येचे अनर्थ किती होऊ शकतात व सर्वांना विद्या देण्याचा सरकारने विचार केला नाही, तर समाजस्वास्थ्य कसे बिघडते, पोलिसयंत्रणेवर कसा ताण येतो, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीमुळे सरकारला कसा खर्च करावा लागतो व हा सर्व पैसा जनतेकडूनच कर रूपाने सरकार कसा वसूल करते याचे अतिशय वस्तुनिष्ठ चित्रण जोतिबांनी केले आहे. म्हणून सर्वांना सक्तीचे शिक्षण देण्याची आवश्यकता जोतिबा प्रतिपादन करतात.

**शिक्षण म्हणजे केवळ बुध्दिविकास नव्हे तर सर्वांगिण विकास** केवळ बुध्दिविकास म्हणजे संपूर्ण विकास नव्हे हे लोकांच्या गळी उतरवण्याची जोतीबांना आवश्यकता वाटली. म्हणून त्यांनी – शूद्र मुलीमुलां शाळेत घालावे । सुशील करावे सर्व कामी ।' अशी शिकवण दिली. त्यांच्या शिक्षणविषयक प्रतिपादनात त्यांनी सत्यनिष्ठा, शीलसंवर्धन, नीतिमत्ता, सौजन्य प्रगतिपर विचार व व्यवहारज्ञान इ. गोष्टींवर खास भर दिला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षणामधून प्रगतिवर विचारांचे बाळकडू मिळाले पाहिजे, त्याच्या मनावर नैतिकतेचे संस्कार झाले पाहिजेत, अशा प्रकारची शिक्षणपध्दती त्यांना अपेक्षित होती. जोतिबा हे मानवतावादाचे उपासक होते. त्यांच्या शिक्षणविशयक दृष्टीकोणही त्यांच्या जीवननिष्ठेशी सुसंगत असा होता.

**शिक्षणतज्ञ महात्मा फुले मूल्यांकन** – भारतीय सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीच्या तत्वज्ञानाचे प्रत्यक्ष रूप त्यांचे शिक्षणविशयक तत्वज्ञान व शिक्षणप्रसाराचे कार्य हेच होते. आधी शिक्षणाव्दारे जागृती म्हणजे पायाभरणी व नंतर या भरभक्कम पायावर आधारित सामाजिक सुधारणेची इमारत असे जोतिबांच्या कार्याचे स्वरुप होते. शिक्षण हे सामाजिक मूल्यपरिवर्तनाचे साधन म्हणूनच त्यांनी मानले होते. तत्कालीन शिक्षणाचा मूलगामी व सर्वांगीण

विचार जोतिबा फुलेंइतका स्पष्ट व प्रखर ध्येयनिष्ठ पध्दतीने कोणालाच मांडता आला नाही.

जोतीबा फुले यांचे शैक्षणिक तत्वाज्ञान म्हणजे अध्यात्मवाद, कार्यावाद व वास्तववाद यांचा सुरेख त्रिवेणी संगम होय. त्यांच्या अध्यात्मवादात 'एकेश्वरवाद' हा प्रधान आहे. सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने त्यांना एक ईश्वर मानणे अधिक योग्य वाटतो. पूजाअर्चेचे स्तोम, देवदेवतांच्या नावाने पुरोहितशाही व्दारे होणारी पिळवणूक या विरोधातच त्यांनी आपले तत्वज्ञान उभे केले. अध्यात्म वादातील उच्च जीवनमूल्यांचे व नैतिक मूल्यांचे अधिष्ठान त्यांनी शिक्षणात संक्रमित केले. चातुर्वर्ण्यावर आधारित परंपरागत समाजरचनेत परिवर्तनशीलता आणण्याची जबाबदारी शिक्षणाचीच आहे हा त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. स्वामी विवेकानंद यांना अभिप्रेत असलेला विश्वधर्म, मानवताध र्म व सर्वधर्मसमभाव जोतिबा फुले यांनाही शिक्षणात माणुसकी निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटत होता.

जोतिबांच्या त्रेसष्ट वर्षाच्या आयुष्यात त्यांचे शिक्षणविषयक विचार त्यांच्या वागण्यातून, बोलण्यातून, व्याख्यानातून, लिखाणातून व्यक्त झालेले आहेत. त्यांचा वास्तवाद हा निसर्गाशी जवळीक साधणारा वास्तववाद नसून बावनकशी सामाजिक वास्तववाद social realism आहे. समाजातील उपेक्षित दलित पीडित व शोषित सर्वसामान्य जनतेचे शोषण जोपर्यंत शिक्षणातून थांबत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने वास्तवाद प्रस्थापित होऊ शकत नाही असा त्यांचा सार्थ दृष्टीकोण होता. शिक्षणातील झिरपण्याच्या सिध्दान्त हे शिक्षणातील वास्तव नसून शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे त्यातील वास्तव होय. शिक्षणातील त्यांना गवसलेले वास्तव जनसामन्यांना समाजवून देताना त्यांनी ब्राम्हण या जातीतील विशिष्ट प्रवृत्तीला जसे धारेवर धरले होते असे इंग्रज शासनावरही भीडमुर्वत न ठेवता टीका केली होती. हे सर्व त्यांनी भारतीय नवसमाजाच्या निर्मितीच्या दृष्टीने विचारात घेतले होते व त्यात सर्वस्पर्शित्व ओतले होते म्हणून ते एक श्रेष्ठ भारतीय शिक्षणतज्ञ ठरतात.

**संदर्भ**

1. *नरके हरि (संपा), आम्ही पाहिलेले फुल, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, 1993*
2. *नरके हरि (संपा), महात्मा फुले साहित्य आणि विचार, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाषन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1993*
3. *देसाई वसंत, महात्मा ज्योतिराव फुले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1969*
4. *कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1973*
5. *देशमुख मा.म., महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन, शिवभारती प्रकाशन, नागपूर, 1997*